महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ २४ फेब्रुवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २३९ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## संपादकीय

### निष्ठावंत सेवेचा गौरव

राज्य शासनाकडून ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार यांना 'वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न पुरस्कार' प्रदान होणे, ही केवळ वैयक्तिक कामगिरीची दखल नाही, तर संपूर्ण शासकीय आरोग्य यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर उमटलेली विश्वासाची मोहोर आहे. प्रशासकीय सेवेत शांतपणे, सातत्याने आणि परिणामकारक काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचा सन्मान होणे ही सकारात्मक परंपरा अधिक बळकट करणारी बाब आहे. कोरोना महामारीच्या काळात शासकीय रुग्णालयांवर अभूतपूर्व ताण होता. वाढती रुग्णसंख्या, मर्यादित साधनसामग्री, आरोग्य कर्मचाऱ्यांचा थकवा आणि नागरिकांमधील भीती — या सर्व परिस्थितीत योग्य निर्णय घेणे हे अत्यंत कठीण होते. मात्र ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयाने या संकटाचा सामना करताना नियोजनबद्धता, समन्वय आणि शिस्त यांचा आदर्श ठेवला. यामागे डॉ. कैलास पवार यांची नेतृत्वक्षमता निर्णायक ठरली, हे नाकारता येणार नाही. ९७६ खाटांची क्षमता असलेले रुग्णालय २ हजार ५७२ खाटांपर्यंत विस्तारण्यामागे केवळ आकड्यांचा खेळ नाही, तर आरोग्यसेवेकडे पाहण्याचा बदललेला दृष्टिकोन आहे. आपत्कालीन परिस्थितीत तात्पुरत्या उपायांपुरते न थांबता, दीर्घकालीन आरोग्य गरजांचा विचार करून करण्यात आलेली ही वाढ भविष्यासाठी मजबूत पायाभूत रचना उभी करते. सरकारी रुग्णालये म्हणजे केवळ गरीबांसाठीची अपरिहार्य सोय नव्हे, तर दर्जेदार उपचार देणारी विश्वासार्ह केंद्रे असू शकतात, हा संदेश यातून मिळतो. आजही अनेक ठिकाणी शासकीय आरोग्य व्यवस्था दुर्लक्षित मानली जाते. मात्र अशा पुरस्कारांमुळे चांगले काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना बळ मिळते, तर इतरांसाठी तो प्रेरणादायी ठरतो. सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचे यश हे एखाद्या व्यक्तीपुरते मर्यादित नसले, तरी सक्षम नेतृत्वाशिवाय ते शक्य होत नाही. डॉ. कैलास पवार यांचा हा सन्मान म्हणजे आरोग्य सेवेत प्रामाणिकपणे काम करणाऱ्या असंख्य डॉक्टर, परिचारिका आणि कर्मचाऱ्यांच्या मेहनतीचा गौरव आहे. अशाच कार्यक्षम नेतृत्वाच्या जोरावर शासकीय आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, विश्वासार्ह आणि लोकाभिमुख बनेल, यासोबतच, अशा पुरस्कारांचे महत्त्व केवळ सत्कारापुरते मर्यादित न ठेवता, त्यातून मिळणाऱ्या अनुभवांचा आणि उत्तम कार्यपद्धतींचा राज्यभर प्रसार होणे आवश्यक आहे. प्रशासनानेही अशा अधिकाऱ्यांना अधिक स्वायत्तता आणि पाठबळ दिल्यास सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक गतिमान होऊ शकते. नागरिकांचा शासकीय रुग्णालयांवरील विश्वास वाढवणे, ही काळाची गरज आहे. त्यासाठी गुणवत्तापूर्ण सेवा, पारदर्शकता आणि संवेदनशीलता या मूल्यांना प्राधान्य द्यावे लागेल. डॉ. कैलास पवार यांचा सन्मान ही त्या दिशेने टाकलेली आशादायी पायरी ठरावी, हीच अपेक्षा.

# दुसरे अजित पवार होणे नाही

## - अधिवेशनात अजीत दादांना सर्वपक्षीय श्रद्धांजली



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता ● प्रतिनिधी / दि. २३**

**मुंबई :** राज्याचा अर्थसंकल्प सादर करताना अजित पवार यांची काम करण्याची पद्धत, शिस्त, स्पष्टवक्तेपणा आणि वेळेचे काटेकोर नियोजन ठळकपणे जाणवत असे, अशा शब्दांत देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवार यांच्या शोकप्रस्तावावर बोलताना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. अजित पवार यांच्याशी असलेले नाते राजकीय नव्हते, तर भावनिक होते, असे नमूद करताना फडणवीस म्हणाले की, शेतकरी पार्श्वभूमीतून आलेले पवार हे मातीतील नेतृत्व होते. समाजाला आपली चूक वाटली, तर त्यांनी जाहीर माफी मागण्याची प्रामाणिकताही दाखवली. पहाटेच्या शपथविधीविषयीची आठवण सांगताना, प्रत्यक्ष शपथविधी सकाळी नऊ वाजता झाला होता, असे अजित पवार नेहमी स्पष्ट करायचे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. पोटात एक आणि ओठात एक अशी त्यांची सवय नव्हती; काम करणे हीच त्यांची खरी सवय होती, असेही त्यांनी नमूद केले. मंत्रिमंडळ बैठकीत प्रत्येक विषयाचा सखोल अभ्यास करून, टिपणांसह उपस्थित राहणारे अजित पवार हे सक्षम प्रशासक होते. राज्यात केवळ दोनच 'दादा' त्यांच्या कामातून लक्षात राहिले—वसंतदादा पाटील आणि अजितदादा पवार, असे सांगत मुख्यमंत्र्यांनी एक नेता, प्रशासक, कुटुंबातील व्यक्ती आणि जवळचा मित्र गमावल्याची भावना व्यक्त केली.

# बदलापुरात पुन्हा बुलडोझर

### दोन आठवड्यांनंतर कारवाईला नव्याने सुरुवात पन्नासहून अधिक बांधकामे जमीनदोस्त

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २३**

**बदलापूर :** दोन आठवड्यांपूर्वी सलग दोन दिवस बदलापूर शहरात करण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामांवरील कारवाईनंतर सोमवारपासून ही मोहीम पुन्हा नव्याने सुरू करण्यात आली. बदलापूर पश्चिमेकडील उल्हास नदीकिनारी असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते बदलापूर गाव रस्त्यालगतची अनधिकृत बांधकामे कुळगाव बदलापूर नगर परिषद यांच्या वतीने जमीनदोस्त करण्यात आली. या कारवाईदरम्यान अनेक दुकानदार व रहिवाशांनी विरोध दर्शविल्याने पालिका प्रशासनाला त्यांचा सामना करावा लागला. मात्र दिवसभरात ५० हून अधिक अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आल्याचे नगर परिषदेने स्पष्ट केले.

**■ याचिकेनंतर अनधिकृत बांधकामांचा मुद्दा ऐरणीवर**

कुळगाव बदलापूर नगर परिषद क्षेत्रातील एका याचिकेच्या सुनावणीदरम्यान बदलापूर शहरातील अनधिकृत बांधकामांचा प्रश्न न्यायालयात चर्चेला आला होता. त्यानंतर नगर परिषदेने शहरातील अनधिकृत बांधकामांची थेट यादी जाहीर केली होती. मात्र त्यावर प्रत्यक्ष कारवाई झालेली नव्हती. दोन आठवड्यांपूर्वी प्रशासनाने धडक कारवाई सुरू केल्यानंतर अनेक नामांकित दुकाने व आस्थापनांच्या वास्तू अनधिकृत असल्याचे उघड झाले होते. काही ठिकाणी दुकानदारांचे नुकसान झाल्याने नागरिकांनी लोकप्रतिनिधींकडे कारवाईपूर्वी वेळ देण्याची मागणी केली होती. त्यानंतर अनेक दुकानदारांनी स्वतःहून अनधिकृत बांधकामांतील साहित्य काढून घेतले होते. कारवाईदरम्यान अनेक मालमत्ताधारकांकडून जागेचा सातबारा उतारा असल्याचे कारण पुढे करून विरोध केला जातो. मात्र सातबारा उतारा किंवा मालकी हक्क असला तरी बांधकामासाठी स्वतंत्र परवानगी आवश्यक आहे. परवानगी नसल्यास कारवाई होणारच, असे नगर परिषद प्रशासनाने स्पष्ट केले. तसेच ज्या जागा आरक्षणात येतात, त्या ठिकाणी हस्तांतरणीय विकास हक्क (टीडीआर) मिळवण्यासाठी नागरिकांनी नगर परिषदेशी संपर्क साधावा, असे आवाहनही प्रशासनाने केले आहे.

**■ कारवाई पुढेही सुरूच राहणार - मारुती गायकवाड**

सायंकाळपर्यंत बदलापूर पश्चिम भागातील ५० हून अधिक अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आल्याची माहिती मारुती गायकवाड यांनी दिली. यापुढेही शहरातील सर्वच अनधिकृत बांधकामांवर कारवाई सुरूच राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. नागरिकांनी आपली अनधिकृत बांधकामे स्वतःहून हटवावीत, अन्यथा प्रशासनाच्या कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशाराही देण्यात आला.

# जलपर्णीने गिळंकृत केली जलवाहिनी

## उल्हासनदीची 'गटारगंगा' होण्याची भीती

### आपटी बंधाऱ्याजवळ गंभीर स्थिती; मासे मृत्युमुखी, दुर्गंधीयुक्त पाणी आणि प्रशासनाची उदासीनता

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २३**

**कल्याण :** कधीकाळी कल्याण तालुक्याची जीवनवाहिनी मानली जाणारी उल्हास नदी सध्या जलपर्णीच्या विळख्यात अडकून अक्षरशः गटारगंगेचे स्वरूप घेत असल्याचे भीषण चित्र समोर आले आहे. आपटी बंधाऱ्याजवळ जलपर्णीने संपूर्ण नदीपात्र गिळंकृत केल्याने मासे व इतर जलचर मृत्युमुखी पडत असून, पाण्याला तीव्र दुर्गंधी येत आहे. या अत्यंत

**आपटी बंधाऱ्याजवळ गंभीर स्थिती; मासे मृत्युमुखी, दुर्गंधीयुक्त पाणी आणि प्रशासनाची उदासीनता**

गंभीर प्रश्नावर केवळ कागदी घोडे नाचवले जात असून, पाणीपट्टी व पाणी उपसाच्या बदल्यात लाखो-कोटींची बिले वसूल करणारी एमआयडीसी तसेच लघुपाटबंधारे विभाग याकडे गंभीरपणे लक्ष देणार का, असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे. कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, ठाणे, नवी मुंबई, मीरा-भाईंदर आदी महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद व ग्रामपंचायतीतील लाखो नागरिक उल्हास नदीच्या पाण्यावर अवलंबून आहेत. मात्र गेल्या काही वर्षांत सांडपाणी, केमिकलयुक्त पाणी, ड्रेनेज, गटारे-नाले, तबेल्यांचे पाणी तसेच नदीकाठावरील फार्महाऊस, हॉटेल व रेस्टॉरंटचे सांडपाणी थेट नदीत सोडले जात असल्याने जलपर्णीचा प्रचंड फैलाव झाला आहे.

**■ एकदा कारवाई, नंतर 'जैसे थे'**

मागील वर्षी तत्कालीन सीईओ रोहन घुगे, प्रदूषण नियंत्रण मंडळ व पत्रकार संजय कांबळे यांच्या पुढाकाराने जलपर्णी काढण्याचे काम झाले होते. मात्र त्यानंतर कोणतीही सातत्यपूर्ण उपाययोजना न झाल्याने परिस्थिती पुन्हा जैसे थे झाली. सोशल मीडियावर आणि जिल्हा नियोजन सभेत विषय चर्चेला आला, पण प्रत्यक्ष कृती मात्र शून्यच राहिली.

## थोडक्यात महत्वाचे







### केडीएमसीची विक्रमी कर वसुली

**६०० कोटींचे चालू वर्षाचे उद्दिष्ट; थकबाकीदारांवर जप्ती व लिलाव नोटिसांचा बडगा**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २३**

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिकाने आतापर्यंत एकूण ३१६ कोटी रुपयांची मालमत्ता कर वसुली केली आहे. चालू आर्थिक वर्षातील मालमत्ता कराचा ६०० कोटी रुपयांचा लक्ष्यांक पूर्ण करण्यासाठी मालमत्ता कर विभागाने थकबाकीदारांवर जप्ती नोटिसा देण्यासह मालमत्ता जप्त करून लिलाव नोटिसा बजावण्यास सुरुवात केली आहे. मागील अनेक वर्षांची थकित रक्कम आणि चालू वर्षाचा लक्ष्यांक मिळून एकूण ७६० कोटी रुपयांच्या वसुलीसाठी पालिका अधिकाऱ्यांनी कंबर कसली आहे. मालमत्ता कर हा पालिकेच्या महसुली उत्पन्नाचा प्रमुख स्रोत असून, वसुली गतीने व्हावी यासाठी मालमत्ता कर विभागप्रमुखांनी पालिकेच्या दहा प्रभागांतील साहाय्यक आयुक्तांना दररोज किमान १० लाख ते ४० लाखांहून अधिक रुपयांची वसुली करण्याचे उद्दिष्ट दिले आहे. वसुलीत कोणतीही दिरंगाई होऊ नये यासाठी उपायुक्त बाळासाहेब चव्हाण दररोज सायंकाळी कर वसुलीचा आढावा घेत आहेत.

**■ डोंबिवलीतील फ प्रभाग आघाडीवर**

दहा प्रभागांमधील एकूण कर वसुलीत डोंबिवलीतील फ प्रभागाने सर्वाधिक म्हणजे ७२ टक्के कर वसुली केली आहे. या प्रभागाचे साहाय्यक आयुक्त प्रसाद ठाकूर व कर वसुली कर्मचाऱ्यांचे योगदान उल्लेखनीय ठरले आहे. त्यानंतर ब प्रभागाने ५९ टक्के, ग प्रभागाने ५५ टक्के, तर ह प्रभागाने ५६ टक्के कर वसुली केली आहे. उर्वरित प्रभागांची वसुली १६ ते ३६ टक्के दरम्यान आहे. थकित रकमेतील एकूण वसुली लक्ष्यांक ३९७ कोटी, तर चालू वर्षाच्या कर रकमेचा लक्ष्यांक ३६३ कोटी आहे. यापैकी थकित करातून ७९ कोटी आणि चालू वर्षाच्या कर रकमेतील २३७ कोटी रुपये कर्मचाऱ्यांनी आतापर्यंत वसूल केले असल्याची माहिती पालिकेकडून देण्यात आली आहे.

# ख्रिश्चन व मुस्लिम समुदायासाठी राखीव जमिनी तातडीने महापालिकांना सोपवा - उच्च न्यायालयाचे आदेश

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २३**

मुंबई : ख्रिश्चन आणि मुस्लिम धर्मीयांच्या दफनभूमीच्या जागेचा प्रश्न वारंवार दिलेल्या आश्वासनांनंतरही दीर्घकाळापासून सुटलेला नाही, असे स्पष्ट निरीक्षण मुंबई उच्च न्यायालय यांनी नुकतेच नोंदवले. तसेच, ख्रिश्चन आणि मुस्लिम समुदायाच्या दफनभूमीसाठी विकास आराखड्यात राखीव असलेल्या जमिनींचा ताबा तातडीने ठाणे महानगरपालिका आणि मीरा-भाईंदर महानगरपालिका यांच्याकडे सोपवण्याचे आदेश न्यायालयाने राज्य सरकारला दिले. विशेष म्हणजे, ठाणेस्थित भाईंदरपाडा येथील संयुक्त स्मशानभूमी व स्मृती उद्यानासाठी राखीव असलेला सुमारे ३७,००० चौरस मीटर भूखंड परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या विहंग समूहाला बहाल केल्याचा आरोप याचिकाकर्त्यांनी केला होता. मात्र, युक्तिवादादरम्यान विहंग समूह तसेच ठाणे महापालिकेने हे आरोप फेटाळले.



**■ विकासक व राखीव भूखंड वेगळे असल्याचा दावा**

विहंग समूहाने बांधकाम केलेली जागा आणि दफनभूमीसाठी विकास आराखड्यात राखीव असलेला भूखंड एकच नसल्याचा दावा ठाणे महापालिकेने न्यायालयात केला. दफनभूमीसाठी राखीव जागेशी विकासकाला दिलेल्या जागेचा कोणताही संबंध नसल्याचेही महापालिकेने स्पष्ट केले.

**■ दोन वर्षांत बांधकाम पूर्ण करण्याचे निर्देश**

ठाणे आणि मीरा-भाईंदर येथील दफनभूमीसाठी राखीव भूखंडांबाबत स्वतंत्र याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. त्या निकाली काढताना मुख्य न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने वरील आदेश दिले. उपलब्ध दफनभूमी अपुरी असल्याबाबत मुस्लिम समुदाय, बोहरा मुस्लिम समुदाय तसेच ख्रिश्चन समुदायाने केलेली तक्रार अद्याप दूर झालेली नसल्याचे न्यायालयाने नमूद केले. त्यामुळे विकास आराखड्यानुसार आधीच राखीव असलेल्या जमिनीचा ताबा तातडीने संबंधित महापालिकांना देण्याचे तसेच ताबा मिळाल्यानंतर दोन वर्षांच्या आत दफनभूमीचे बांधकाम पूर्ण करण्याचे स्पष्ट आदेश राज्य सरकारला देण्यात आले.

# हिंद दी चादर उपक्रमांतर्गत गुरुद्वारात मोफत आरोग्य शिबिर

### श्री गुरुतेग बहादूर साहिबजी यांच्या शहिदी समागमाच्या निमित्ताने नागरिकांसाठी आरोग्य तपासण्यांचा उपक्रम



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २३**

**ठाणे :** हिंद दी चादर या उपक्रमांतर्गत श्री गुरुतेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागमाच्या निमित्ताने ठाणे महानगरपालिका यांच्या वतीने ठाण्यातील गुरुद्वारात आज मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या आरोग्य शिबिरास ठाणे महानगरपालिकेचे उपायुक्त उमेश बिरारी, सहाय्यक आयुक्त सोपान भाईक तसेच माजी नगरसेवक गुरुमुखसिंग स्यान यांची उपस्थिती होती. ठाण्यातील तीन हात नाका येथील द्रुतगती मार्गालगत असलेल्या गुरुद्वारात हे शिबिर पार पडले. शिबिरामध्ये नागरिकांसाठी रक्तदाब तपासणी, मधुमेह तपासणी तसेच प्राथमिक आरोग्य तपासण्या करण्यात आल्या.

**■ सिख बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

गुरुद्वारात येणाऱ्या सिख बांधवांसह सर्वसामान्य नागरिकांनी या आरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. नागरिकांना आरोग्याबाबत जागरूक करणे व वेळेत तपासणी करून आजारांचे लवकर निदान व्हावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

**■ सामाजिक व आरोग्यविषयक जनजागृतीला चालना**

हिंद दी चादर या उपक्रमाच्या माध्यमातून सामाजिक, आरोग्यविषयक व जनजागृतीपर कार्यक्रम सातत्याने राबविले जात असून, अशा उपक्रमांमुळे समाजातील विविध घटकांना थेट लाभ मिळत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.





# तरुण रक्ताचा नवा निर्धार

**तुषार माधव प्रभुदेसाई**
कोकण प्रांत संयोजक
भारतीय जनता युवा मोर्चा

माझ्या तरुण मित्रांनो, स्वामी विवेकानंद म्हणायचे, "उठा, जागे व्हा आणि ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका!" आज आपला देश एका अशा वळणावर उभा आहे, जिथे तुमच्या ऊर्जेची, प्रामाणिकपणाची आणि नाविन्यपूर्ण विचारांची देशाला नितांत गरज आहे. आपण नेहमी म्हणतो की राजकारण बदलायला हवे, पण एक गोष्ट सदैव लक्षात ठेवा— "बदल घडवण्यासाठी स्वतः बदलाचा भाग व्हावे लागते."

विद्यार्थी विभाग हाच कोणत्याही राजकीय प्रवासाचा खरा आणि भक्कम पाया असतो. वयाचे १८ ते ३५ हे वर्ष म्हणजे केवळ करिअर घडवण्याचा काळ नाही, तर विचारांची जडणघडण होणारा क्रांतीचा काळ आहे. जेव्हा एखादा तरुण आपल्या वैयक्तिक स्वार्थाच्या पलीकडे जाऊन 'राष्ट्र प्रथम' हा विचार आपल्या अंगात भिनवतो, तेव्हाच खऱ्या अर्थाने समाज परिवर्तनाची नांदी लागते. "ज्यांच्या मनगटात बळ आणि विचारात राष्ट्रवाद असतो, तोच तरुण इतिहास घडवतो."

तरुणांनी आता केवळ 'Follower' (अनुयायी) म्हणून नव्हे, तर 'Leader' (नेतृत्व) म्हणून पुढे येत समाज आणि राष्ट्रासाठी कार्य करण्याचा संकल्प केला पाहिजे. स्वतःची ओळख, ध्येय आणि जबाबदारी यांची जाणीव ठेवून कार्य केल्यास युवक देशाच्या प्रगतीत मोलाचे योगदान देऊ शकतात. आज गरज आहे ती 'ग्रास रूट' (Grassroot) म्हणजेच तळागाळातील राजकारणात तरुणांनी हिरीरीने उतरण्याची. ज्या दिवशी आपल्यासारखा सामान्य घरातील, कष्टाळू आणि सुशिक्षित तरुण जमिनीवरचे प्रश्न सोडवण्यासाठी धोरणकर्त्यांच्या भूमिकेत येईल, त्या दिवशी भारताचे भविष्य खऱ्या अर्थाने उज्ज्वल असेल.

राजकारण ही केवळ सत्ता मिळवण्याची जागा नसून ती 'राष्ट्रसेवा' करण्याची एक पवित्र संधी आहे. चला तर मग, केवळ प्रेक्षक न राहता, या बदलत्या भारताचे आपण सक्रिय भागीदार होऊया आणि आपल्या कर्तृत्वाने एक नवा इतिहास घडवूया!

शेवटी, हा विचार जनमानसापर्यंत पोहोचवण्यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे, मार्गदर्शकांचे आणि हितचिंतकांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. तुमच्या साथीनेच आपण हे ध्येय गाठू शकू.

# ४/जे प्रभागातील प्रशिक्षण केंद्र लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांसाठी उपयुक्त - महापौर हर्षाली चौधरी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता




**कल्याण** : 4/जे प्रभागात उभारण्यात आलेल्या आखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रशिक्षण केंद्राचा लोकप्रतिनिधींना आणि अधिकाऱ्यांना चांगला फायदा होईल, असे उद्गार महापौर हर्षाली चौधरी यांनी आज काढले. महापालिकेच्या 4/जे प्रभाग कार्यालयात नव्याने उभारलेल्या आखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रशिक्षण केंद्राच्या उद्घाटन समयी बोलताना त्यांनी हे उद्गार काढले.

यासमयी आखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे महासंचालक जयराज फाटक, महापालिका आयुक्त अभिनव गोयल, उपमहापौर राहुल दामले, महापालिका सचिव किशोर शेळके, आखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे वित्त अधिकारी देवर्षी पंडा, नाशिक केंद्राचे प्रादेशिक संचालक जीवन सोनावणे आणि कल्याणचे केंद्राचे प्रादेशिक संचालक मारुती खोडके तसेच महापालिकेचे पालिका सदस्य, सदस्या व्यासपीठावर उपस्थित होत्या.

आखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेची प्रशिक्षण केंद्रे मुंबई आणि नवी मुंबईत उपलब्ध आहेत, तथापि वाढत्या लोकसंख्येमुळे नवीन विभागीय प्रशिक्षण केंद्राची आवश्यकता होती आणि आता हे कल्याणचे प्रशिक्षण केंद्र सर्व विभागांना चांगल्या रितीने प्रशिक्षण देवू शकेल, असे उद्गार आखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे महासंचालक जयराज फाटक यांनी यावेळी बोलताना काढले.

महाराष्ट्रातील आखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे 9वे प्रशिक्षण केंद्र कल्याणमध्ये महापालिकेच्या 4/जे प्रभाग कार्यालयात उभे राहिले असून, त्याचा फायदा कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील तसेच नजीकच्या महापालिकेतील कर्मचाऱ्यांना चांगल्या प्रकारे होईल, असे उद्गार महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी यावेळी बोलताना काढले.

तर, चांगल्या कामासाठी महानगरपालिकेने ही जागा उपलब्ध करुन दिली आहे. आखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेने या जागेचा चांगला सदुपयोग करावा. चांगल्या एनजीओंसाठी महापालिकेने कायम मदत करावी, लोकप्रतिनिधींनीही अशा गोष्टींसाठी कायम सहकार्य करतील, असे उद्गार उपमहापौर राहुल दामले यांनी यावेळी बोलताना काढले.

महापालिकेच्या 4/जे प्रभाग कार्यालयात आखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रशिक्षण केंद्रासाठी 554 चौ.मी. इतकी प्रशस्त जागा महापालिकेने उपलब्ध करुन दिली असून, सदर जागेमध्ये महापालिका कर्मचाऱ्यांसाठी एलएसजीडी, एलजीएस, एसआय, डीएलजीएफएम इ. बाबतचे प्रशिक्षण लवकरच सुरु करण्यात येईल, अशी माहिती कल्याण प्रशिक्षण केंद्राचे संचालक मारुती खोडके यांनी दिली.

# कल्याण डोंबिवली महानगर पालिका क्षेत्रात शिष्यवृत्ती परीक्षा संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद - पुणे आयोजित इयत्ता 5 वी तसेच इयत्ता 8 वी मधील विद्यार्थ्यांसाठी पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती तसेच पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा प्रती वर्षी आयोजित केली जाते. शैक्षणिक वर्ष 2025-26 साठी ही परीक्षा रविवार दिनांक 22 फेब्रुवारी 2026 रोजी महाराष्ट्र राज्यात एकाच वेळी आयोजित करण्यात आली होती. कल्याण डोंबिवली महानगर पालिका क्षेत्रात देखील सदर शिष्यवृत्ती परीक्षा सुरळीतपणे संपन्न झाली. कल्याण डोंबिवली महानगर पालिका क्षेत्रातील 249 शाळांमधील एकूण 4303 विद्यार्थ्यांनी इयत्ता 5 वी साठी ची शिष्यवृत्ती परीक्षा तर 195 शाळांमधील 2439 विद्यार्थ्यांनी इयत्ता 8 वी साठीची शिष्यवृत्ती परीक्षा दिली. यासाठी कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात एकूण 28 परीक्षा केंद्राची निर्मिती करण्यात आली असून एकूण परीक्षा केंद्रावर एकूण 450 अधिकारी/ कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली होती. कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील शिष्यवृत्ती परीक्षेचे संपूर्ण नियोजन व आयोजन प्रशासन अधिकारी भारत बोरनारे तसेच शिक्षणाधिकरी विजय सरकटे यांच्या मार्गदर्शन तसेच नियंत्रणाखाली सुरळीतपणे करण्यात आले.

महापालिका महापौर हर्षाली थवील-चौधरी , उप महापौर राहूल दामले तसेच आयुक्त अभिनव गोयल यांनी सर्व परीक्षार्थी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

शासन निर्णयानुसार चालू शैक्षणिक वर्षात इयत्ता 5 वी बरोबरच इयत्ता 4 थी तसेच इयत्ता 8 वी बरोबरच इयत्ता 7 वी साठी देखील शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन दिनांक 26 एप्रिल, 2026 रोजी केले जाणार आहे त्यासाठी सुद्धा कल्याण डोंबिवली महानगर पालिका शिक्षण विभाग पूर्णतः सज्ज असल्याचे प्रशासन अधिकारी भारत बोरनारे साहेबांनी सांगितले आणि पुढील शैक्षणिक वर्षापासून इयत्ता 4 थी व 7 वी साठीच्या शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन होणार आहे अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.

## जीवनदीप महाविद्यालयात

# श्री गुरु तेगबहादुर साहिबजींना मानवंदना

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**गोवेली** : आज दिनांक २३-०२-२०२६ वेळ सकाळी ९.०० वाजता शिख धर्माचे नववे गुरु परमपूज्य श्री गुरु तेगबहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त जीवनदीप महाविद्यालय, गोवेली येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यांच्या अद्वितीय शौर्य, त्यागासाठी दिलेल्या बलिदानाची आठवण ठेवत त्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाचे स्वरूप कार्यक्रमाची सुरुवात समूहगानाने करण्यात आली. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सकाळी ठीक ९.०० वाजता सर्वांनी आपापल्या ठिकाणी उभे राहून तीन मिनिटे स्तब्ध उभे राहून गुरु तेगबहादुर साहिबजींना यांना मानवंदना दिली.व त्यांच्या शौर्य व कार्याची माहिती तसेच जीवनकार्याविषयी माहिती देण्यात आली. त्यांनी धार्मिक स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी दिलेले बलिदान, अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची त्यांची प्रेरणादायी भूमिका आणि समाजाला दिलेला मानवतेचा संदेश याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. त्यांच्या शौर्यकथेमुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, सहिष्णुता व नैतिक मूल्यांची जाणीव दृढ झाली. जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष. रविंद्र घोडविंदे, संचालक. प्रशांत घोडविंदे, प्राचार्य. डॉ. अशोक वाघ, उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सदर कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध व प्रेरणादायी वातावरणात पार पडला. सर्वांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग घेत गुरु तेगबहादुर साहिबजींप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

# 400 कोटी माफी कुठे गेली?

## 1037 कोटींचा आकडा कसा वाढला? – मयेकरांचा सवाल"

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



20 फेब्रुवारी 2026 रोजी झालेल्या Ulhasnagar Municipal Corporation च्या सभेत नागसेवक विपुल दत्ताराम मयेकर यांनी MIDC पाणी बिलाचा मुद्दा ठामपणे उपस्थित केला. 2023 साली Maharashtra Industrial Development Corporation (MIDC) च्या 400 कोटी रुपयांच्या दंड व व्याज माफीचा निर्णय झाला होता, तर 200 कोटी रुपये हप्त्यांमध्ये भरण्याचे ठरले होते. मात्र सध्या थकीत रक्कम 1037 कोटी रुपये कशी झाली, याचा लेखी खुलासा करण्याची मागणी त्यांनी केली. सभेदरम्यान या मुद्द्यावर बहुतांश सदस्यांनी भूमिका मांडली नाही. मात्र मयेकर यांनी नागरिकांच्या हिताचा प्रश्न उपस्थित केल्याने शहरात सकारात्मक प्रतिक्रिया उमटत असून, "किमान एक जण तरी जनतेसाठी बोलला," अशी भावना व्यक्त होत आहे. उल्हासनगर महापालिकेच्या सभेत MIDC पाणी बिलाच्या वाढत्या थकबाकीचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आला असून, या मुद्द्यावर नगरसेवक विपुल दत्ताराम मयेकर यांनी ठाम भूमिका घेत प्रशासनाकडे थेट जाब विचारला आहे. पूर्वी ठरलेल्या दंडमाफी व हप्त्यांच्या निर्णयानंतरही थकीत रक्कम प्रचंड वाढल्याने नागरिकांच्या पैशांचा नेमका वापर कुठे होत आहे, हा प्रश्न उपस्थित होत असून, मयेकर यांच्या भूमिकेमुळे शहरात सकारात्मक चर्चा सुरू झाली आहे.

# संत गाडगे बाबा यांच्या जयंती दिनी महापालिकेतर्फे अभिवादन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : संत गाडगे बाबा यांचा जयंती दिन कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत संपन्न झाला. महापालिका मुख्यालयात आज त्यांच्या प्रतिमेस महापालिका महापौर हर्षाली चौधरी यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या समयी उपस्थित महापालिका आयुक्त अभिनव गोयल, अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे, मुख्य लेखा परिक्षक सुरेश बनसोडे, अतिरिक्त शहर अभियंता प्रशांत भागवत, महापालिका सचिव किशोर शेळके, शिवसेना गटनेते विश्वनाथ राणे, उपआयुक्त कांचन गायकवाड, कार्यकारी अभियंता शैलेश मळेकर, मनोज सांगळे, राजु राठोड, मुख्य उद्यान अधिक्षक संजय जाधव, माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे, सुरक्षा अधिकारी भरत बुळे व इतर कर्मचारी वर्ग यांनी देखील संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेस पुष्पसुमने अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी महापालिकेचे मुख्य लेखा परिक्षक सुरेश बनसोडे यांनी संत गाडगे बाबा यांच्याबाबत माहिती आपल्या रसाळ व सहजसुलभ शब्दात उपस्थितांसमोर विषद केली.

# संत गाडगेबाबा जयंती निमित्त भिवंडी पालिकेतर्फे अभिवादन

## स्वच्छतेमुळे आपले आरोग्य निरोगी राहते - महापौर नारायण चौधरी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**भिवंडी** : संत गाडगेबाबा चे कार्य सर्वसामान्यांसाठी समर्पित होते.त्यांनी सार्वजनिक स्वच्छता आणि आरोग्य विषयक संदेश देण्यासाठी ते ज्या गावात प्रवेश करत, तेथे प्रथम स्वयं आणि उपस्थित लोकांसोबत मिळून रस्ते, सार्वजनिक जागा,मंदिर परिसर, तलाव अशा सर्व ठिकाणी स्वच्छता अभियान राबवायचे.स्वतः खराटा घेऊन त्यांची स्वच्छता मोहीम सुरू व्हायची.त्यांचा संदेश फक्त उपदेश स्वरूपात नव्हे तर प्रत्यक्ष कार्य करून दाखवून देण्याची प्रेरणा होती म्हणून ते महान व्यक्तिमत्व होते असे गौरव शादी उद्गार भिवंडी महापालिकेचे नवनिर्वाचित महापौर नारायण रतन चौधरी यांनी येथे झालेल्या कार्यक्रमात व्यक्त केले. संत गाडगे बाबा यांच्या जयंती निमित्त महानगरपालिका मुख्यालय इमारतील तळमजल्यावर महापौर नारायण चौधरी यांच्या हस्ते यांच्या उपस्थितीत संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन त्यांना अभिवादन करण्यात आले.

प्रसंगी आयुक्त अनमोल साग,उपमहापौर मोमीन अब्दुल तारिक बारी,अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके,नयना ससाणे, उप-आयुक्त विक्रम दराडे,उपआयुक्त शहर अभियंता जमिल पटेल, सचिन नाईक,पाणी पुरवठा अभियंता संदिप पटणावर,सहाआयुक्त अजित महाडीक,नितीन पाटील,सुधीर गुरव, निलेश संखे,जनसंपर्क विभाग सहअधिकारी ओमकार पवार,अरविंद घुगरे तसेच सामाजिक कार्यकर्ते सुरेश जैन,विकी चौधरी,अधिकारी कर्मचारी व नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. स्वच्छतेमुळे आपले आरोग्य निरोगी राहते त्यामुळे प्रत्येकाने आपल्या घरासोबत शहर स्वच्छ ठेवण्यासाठी महापालिका प्रशासनाला सहकार्य करणे आवश्यक आहे असे आवाहन महापौर नारायण चौधरी यांनी याप्रसंगी केले.यावेळी आयुक्तांनी त्यांना एक पुस्तक भेट दिले.

## जीवनदीप महाविद्यालयात

# दहावीच्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्पांनी स्वागत

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**गोवेली(प्रशांत घोडविंदे)** : शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे दिनांक २३-०२-२०२६ रोजी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षेनिमित्त विशेष स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासातील महत्त्वाच्या टप्प्याच्या पार्श्वभूमीवर त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी गुलाब पुष्प देऊन त्यांचे उत्साहवर्धन करण्यात आले. या प्रसंगी जीवनदीप संस्थेच्या संचालिका सौ. स्मिता घोडविंदे यांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने व सकारात्मक दृष्टिकोनातून परीक्षा देण्याचे आवाहन केले. तसेच निर्मल इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुख्याध्यापिका भावना कुंभार यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत परिश्रम आणि शिस्त यांच्या बळावर यश संपादन करण्याचा संदेश दिला. वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक वाघ, उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रकाश रोहणे यांच्यासह इतर शिक्षक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत त्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

# संत गाडगे बाबा जयंतीनिमित्त ठाणे महापालिकेत अभिवादन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे महानगरपालिकेच्या विद्यमाने संत गाडगे बाबा जयंतीनिमित्त त्यांचे प्रतिमेस महापालिकेच्या कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे, नगसेवक संजय वाघुले, नगरसेविका पद्मा भगत, उपायुक्त जी.जी. गोदेपुरे, उमेश बिरारी, प्र. उपमाहिती जनसंपर्क अधिकारी प्राची डिंगणकर यांच्यासह महापालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.

# भविष्यवेध



मंगळवार
२४ फेब्रुवारी २०२६

**मेष**
तुमच्या भावंडांसोबत चर्चा कराल. आज कोणाशीही अनावश्यक वाद टाळावेत. कापड क्षेत्रातील लोकांना आज अचानक मोठा नफा मिळू शकतो.

**वृषभ**
तुमची आर्थिक परिस्थिती पूर्वीपेक्षा मजबूत राहील. चांगले आरोग्य राखण्यासाठी तुमच्या दैनंदिन दिनचर्येत ध्यान आणि योगाचा समावेश करा.

**मिथुन**
आज प्रेमी एकमेकांच्या भावनांची कदर करतील. तुमचा जोडीदार तुम्हाला आश्चर्यचकित करेल. मुलांसाठी आजचा दिवस चांगला असेल.

**कर्क**
आईसोबत धार्मिक कार्यात सहभागी झाल्याने शांती मिळेल. कुटुंबासोबत संध्याकाळ चांगली जाईल. वैवाहिक जीवन सुसंवादी राहील.

**सिंह**
चुकांमधून शिकल्याने तुम्हाला पुढे जाण्याची प्रेरणा मिळेल. भावंडांसोबत खेळ खेळण्याची योजना कराल आणि वडिलांचे आशीर्वाद तुमच्यासोबत राहतील.

**कन्या**
अविवाहित लोकांना आज लग्नाचे चांगले प्रस्ताव मिळतील. कोर्टाच्या बाबतीत तुम्ही अनुभवी व्यक्तीचा सल्ला घ्यावा. विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला असेल.

**तुळ**
मेहनतीचे फळ तुम्हाला नक्कीच मिळेल. घरबसल्या व्यवसाय सुरू करण्याचा विचार करणाऱ्या या राशीच्या महिलांसाठी आजचा दिवस चांगला आहे.

**वृश्चिक**
गायकांना आज एक मोठी संधि मिळेल, जे त्यांचे जीवन बदलून टाकेल. कोणत्याही गोष्टीत घाई करू नका. नात्यात गोडवा वाढेल. सकारात्मक प्रतिसाद मिळेल.

**धनु**
दिवस चांगला आहे. समाजाच्या कल्याणासाठी तुमच्या कामाचे कौतुक केले जाईल. जोडीदारासाठी काहीतरी गोड बनवू शकतात आणि त्यांना खाऊ घालू शकतात.

**मकर**
कोणतेही काम करताना मन शांत ठेवा, यामुळे तुमचे काम सोपे होईल. मोठे आर्थिक निर्णय काळजीपूर्वक घ्यावेत. जुन्या गोष्टींबद्दल गोंधळलेले असाल.

**कुंभ**
जोडीदारासोबतचे नाते सुधारण्यासाठी त्यांना भेटवस्तू द्या. एखादा मित्र तुम्हाला कामे पूर्ण करण्यास मदत करेल. व्यवसाय पुढे नेण्यासाठी नवीन योजना बनवाल.

**मीन**
स्पर्धा परीक्षांशी संबंधित चांगल्या बातम्या येतील. आर्थिक स्थिरता राहील. मित्रांसोबत तुम्ही काही आनंदाचे क्षण घालवाल. कामाबद्दल कौतुक होईल.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://www.facebook.com/jeevandeepnews/
https://www.instagram.com/thane_jeevandeep/
https://x.com/Jeevandeepvarta
https://jeevandeepvarta.com/

# कल्याणमध्ये 'स्मार्टबाइट पेडल पॉवर सायक्लोथॉन'ला प्रतिसाद

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २३**

**कल्याण(प्रशांत घोडविंदे)** : कल्याण शहरात काल SmartByte Pedal Power Cyclothon उत्साहात पार पडला. 'Strong Body, Smart Skills' या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या सायक्लोथॉनमध्ये विविध वयोगटातील सायकलप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. आरोग्य, तंदुरुस्ती आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.ही सायक्लोथॉन कल्याण पश्चिमेतील मॅक्सी





ग्राउंड येथून सुरू होऊन नाना फडके मैदान येथे संपन्न झाली. सुमारे १० किलोमीटर अंतराच्या या सायक्लोथॉनमध्ये सहभागी सकाळी लवकरच उपस्थित झाले होते. सकाळी ७.१५ वाजता झेंडा दाखवून सायक्लोथॉनला सुरुवात करण्यात आली.

### संयुक्त आयोजनातून यशस्वी उपक्रम

हा उपक्रम SmartByte Computer Education यांनी सायकल राइडर लवर्स ग्रुप, कल्याण यांच्या सहकार्याने आयोजित केला होता. शिस्तबद्ध नियोजन आणि उत्तम व्यवस्थापनामुळे संपूर्ण कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

### प्रमुख पाहुण्यांची उपस्थिती

या सायक्लोथॉनला विद्यमान नगरसेवक गणेश जाधव तसेच माजी आमदार नरेंद्र पवार यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लावली. त्यांनी सहभागी सायकलस्वारांचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे आरोग्याबरोबरच सामाजिक आणि पर्यावरणीय जागरूकताही वाढते, असे मत व्यक्त केले.

### फिटनेस आणि पर्यावरणाचा संदेश

सायकल चालविण्याचे आरोग्यदायी फायदे, नियमित व्यायामाचे महत्त्व आणि प्रदूषणमुक्त जीवनशैलीचा संदेश या सायक्लोथॉनच्या माध्यमातून देण्यात आला. युवक, महिला तसेच ज्येष्ठ नागरिकांचा सहभाग लक्षणीय ठरला.

कार्यक्रमाच्या शेवटी सहभागी सर्व सायकलस्वारांना आयोजकांकडून टी-शर्ट, पदक, प्रमाणपत्र तसेच नाश्ता देण्यात आला. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि सकारात्मक वातावरणात पार पडला.

# ठाणे महापालिकेत सभागृहनेते हणमंत जगदाळे, विरोधी पक्षनेते अशरफ ऊ शानू पठाण

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे (23)** :ठाणे महानगरपालिकेच्या सभागृहनेते पदी शिवसेनेचे हणमंत जगदाळे तर नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टीचे शरदचंद्र पवार पक्षाचे गटनेते अशरफ ऊ शानू पठाण यांची निवड झाल्याची घोषणा महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी आज झालेल्या मा. महासभेत केली.

यावेळी उपमहापौर कृष्णा पाटील, महापालिका आयुक्त सौरभ राव, अतिरिक्त आयुक्त 1 संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे, महापालिका सचिव मनीष जोशी उपस्थित होते.

महापौर शर्मिला पिंपळोलकर व आयुक्त सौरभ राव यांनी सभागृह नेते हणमंत जगदाळे व विरोधी पक्ष नेते अशरफ ऊ शानू पठाण यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करुन त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच शिवसेना पक्षाचे गटनेते पवन कदम, भारतीय जनता पार्टीचे गटनेते मुकेश मोकाशी, नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टीचे अजित पवार गटाचे गटनेते नजीब मुल्ला, एमआयएमचे सरफराज खान ऊर्फ सैफ पठान यांचेही पुष्पगुच्छ देवून महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी अभिनंदन केले.



**ठाणे महानगरपालिकेच्या सभागृहनेतेपदी निवड झालेले हणमंत जगदाळे यांचे अभिनंदन करताना महापौर शर्मिला पिंपळोलकर, आयुक्त सौरभ राव, अतिरिक्त आयुक्त 1 संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे, महापालिका सचिव मनीष जोशी, शिवसेना गटनेते पवन कदम, भाजपा गटनेते मुकेश मोकाशी, नगरसेवक राम रेपाळे आदी**

**ठाणे महानगरपालिकेच्या विरोधी पक्षनेते पदी निवड झालेले अशरफ ऊ शानू पठाण यांचे अभिनंदन करताना महापौर शर्मिला पिंपळोलकर, आयुक्त सौरभ राव, अतिरिक्त आयुक्त 1 संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे, महापालिका सचिव मनीष जोशी, शिवसेना गटनेते पवन कदम, भाजपा गटनेते मुकेश मोकाशी, नगरसेवक राम रेपाळे आदी.**

# महापालिका शाळेच्या व्यासपीठावरुन संवाद साधण्याचा आनंद वेगळाच : अभिनेते दत्तू मोरे

- **ठाणे महानगरपालिका शिक्षण विभागाचा मध्यवर्ती सांस्कृतिक महोत्सव जल्लोषात साजरा**
- **अभिनेते दत्तू मोरे यांनी उलगडला मनपा शाळा क्र. 111 ते हास्यजत्रापर्यंतचा प्रवास**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे (23)** : मी स्वत: ठाणे महानगरपालिकेच्या शाळा क्र. 111 चा माजी विद्यार्थी असून शाळेत असताना याच मंचावरुन मला प्रथम क्रमाकांचे पारितोषिक प्राप्त झाले आहे. शाळेच्या मंचावरुन सुरू झालेला हा प्रवास आज हास्यजत्राच्या मंचापर्यत पोहचला आहे, त्यामुळे आज शाळेच्या व्यासपीठावरुन संवाद साधताना एक वेगळाच आनंद वाटत असल्याचे हास्यजत्रा फेम अभिनेता दत्तू मोरे यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी 'हास्यजत्रा' फेम अभिनेता म्हणून ओळख मिळेपर्यंत कसा झाला, याचा प्रेरणादायी प्रवास त्यांनी विद्यार्थ्यांसमोर उलगडला.

ठाणे महानगरपालिका शिक्षण विभागातर्फे आयोजित मध्यवर्ती सांस्कृतिक महोत्सव 2025-2026 हा आज दि. 23 फेब्रुवारी 2026 रोजी गडकरी रंगायतन येथे उत्साहात व जल्लोषात पार पडला. यावेळी उपमहापौर कृष्णा पाटील,



अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, परिवहन व्यवस्थापक भालचंद्र बेहरे, उपआयुक्त उमेश बिरारी, उपआयुक्त (शिक्षण) मिताली संचेती, नगरसेवक मनोहर डुंबरे, शिक्षणाधिकारी शेषराव बडे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण, दीपप्रज्वलन व नटराज पूजनाने झाली. या सांस्कृतिक स्पर्धांमध्ये एकूण 102 शाळांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. इयत्ता 1 ली ते 5 वी नृत्य विभाग, इयत्ता 6 वी ते 8 वी नृत्य विभाग तसेच इयत्ता 1 ली ते 8 वी नाट्य विभाग अशा विभागनिहाय स्पर्धा दि. 23 व 24 डिसेंबर रोजी पार पडल्या होत्या. इयत्ता 1 ली ते 5 वी नृत्य विभाग: शाळा क्र. 53 – प्रथम क्रमांक, इयत्ता 6 वी ते 8 वी नृत्य विभाग: शाळा क्र. 59 – प्रथम क्रमांक, नाट्य विभाग: शाळा क्र. 11 – प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करून त्यांच्या कलागुणांना उत्तेजन देणारे मनोगत व्यक्त केले. मध्यवर्ती सांस्कृतिक महोत्सव समितीच्या अध्यक्षा सविता चौधरी, उपकार्याध्यक्षा नीलिमा पाटील, चिटणीस वर्षा मटकर, सहचिटणीस आशा पाटे, युआरसी प्रमुख रविंद्र पाटील, मुश्ताक पठाण व इतर पदाधिकाऱ्यांनी शिक्षणाधिकारी शेषराव बडे व गटाधिकारी संगीता बामणे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन केले. तसेच ठाणे जिल्हा शिक्षक सेनेचे अध्यक्ष सुनील फापाळे, ठाणे मनपा शिक्षक संघटनेचे अध्यक्ष बाबाजी फापाळे, ठाणे जिल्हा शिक्षक पतपेढीचे संचालक जगन जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश पाटील व वनिता जाधव यांनी प्रभावीपणे केले.

एकूणच उत्साह, जल्लोष आणि आनंदाने ओतप्रोत भरलेला हा मध्यवर्ती सांस्कृतिक महोत्सव विद्यार्थ्यांसाठी अविस्मरणीय ठरला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देत त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्याचा शिक्षण विभागाचा प्रयत्न यशस्वी ठरल्याचे या कार्यक्रमातून अधोरेखित झाले. हिंद द चादर या उपक्रमातंर्गत विद्यार्थीनी सादर केले समूहगान शिखांचे नववे गुरु, "हिंद दी चादर" परमपूज्य गुरु तेग बहादूर यांच्या जीवनावर आधारित भक्तिगीताचे समूहगान सादर करण्यात आले. मनपा शाळा क्र. 13 व 41 च्या विद्यार्थिनींनी सुरेल ईशस्तवन व स्वागतगीत सादर करून वातावरण भक्तिमय केले.

# संत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : थोर समाजसुधारक, स्वच्छता व सामाजिक समतेचे प्रणेते संत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

या प्रसंगी अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) रूपाली भालके, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) वैशाली माने, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) वरुणकुमार सहारे, उपजिल्हाधिकारी (रोहयो) शशिकांत गायकवाड, तहसीलदार (सर्वसाधारण) सचिन चौधर, तहसीलदार (संगणक/सांख्यिकी) संदीप थोरात, तहसीलदार (रेतीगट) अमोल कदम तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संत गाडगे महाराज यांनी कीर्तनांच्या माध्यमातून समाजात स्वच्छता, नैतिकता आणि समतेचा संदेश दिला. त्यांच्या कार्यातून समाजजागृतीची चळवळ उभी राहिली.

# माझी वसुंधरा अभियान ५.० : महापालिकेला दीड कोटीचा अभिमानास्पद गौरव

## - महापौर हर्षाली चौधरी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : माझी वसुंधरा अभियान 5.0 (सन 2024-25) अमृत गटात कोकण विभागीय स्तरावर महापालिकेला प्राप्त झालेला दीड कोटीचा पुरस्कार ही अतिशय अभिमानास्पद बाब आहे, असे प्रतिपादन महापौर हर्षाली चौधरी यांनी आज केले. महापालिकेला या मिळालेल्या पुरस्कारासाठी परिश्रम घेतलेल्या अधिकारी/कर्मचारी वर्गाच्या कौतुक सोहळयाचे आयोजन आज मा.स्थायी समिती सभागृहात करण्यात आलेले होते. त्यावेळी बोलताना महापौरांनी हे प्रतिपादन केले आणि पुरस्कार प्राप्त अधिकारी/कर्मचारी वर्गाचे अभिनंदन केले.

महानगरपालिका चांगले काम करीत आहे, याची पोचपावती म्हणजे हा पुरस्कार आहे. चांगल्या कामाचे समाधान नक्कीच मिळते, असे उद्गार महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी आपल्या भाषणात काढले. तथापि कचऱ्याची समस्या मोठी आहे, यासाठी कचरा विलगीकरण करणे आवश्यक आहे. मनपा क्षेत्रातील गृहसंकुले, विद्यार्थी, एनजीओ यांच्या मदतीने याबाबतची जनजागृती करण्यात यावी, असे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यांच्या समन्वयाने शहराचा विकास पुर्णत्वास जावू शकतो, असे सांगत उप महापौर राहुल दामले यांनी सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

पृथ्वी, जल, अग्नि, वायू आणि आकाश या निसर्गाशी संबंधित पंच तत्वावर आधारित माझी वसुंधरा



अभियान 5.0 मध्ये राज्यातील 422 नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी आपला सहभाग दर्शविला होता. या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी शहरात विविध पर्यावरणपूरक प्रकल्प, व्यापक जनजागृती मोहिमा, नागरीकांचा सक्रीय सहभाग तसेच पर्यावरण संवर्धन व साश्वत विकासासाठी तांत्रिक आणि व्यवहारीक उपयोजनांची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यात आली. त्यामुळे हे यश प्राप्त होण्यासाठी वर्षभर सातत्याने परिश्रम घेतलेले अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, शहर अभियंता अनिता परदेशी, अतिरिक्त शहर अभियंता (विद्युत) प्रशांत भागवत आणि त्यांचे सहकारी, अतिरिक्त शहर अभियंता (जनि:मनि:) जगदीश कोरे आणि त्यांचे सहकारी, पर्यावरणाचे उपआयुक्त समीर भुमकर, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त रामदास कोकरे आणि त्यांचे सहकारी, कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे आणि त्यांचे सहकारी, मुख्य उद्यान अधिक्षक संजय जाधव आणि त्यांचे सहकारी तसेच कार्यकारी अभियंता शैलेश मळेकर, मनोज सांगळे, या अभियानाचे शहर समन्वयक गितेश झुंझारराव, माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे व मनपाच्या सोशल मिडीया टिमचे उमेश यमगर तसेच या अभियानासाठी परिश्रम घेतलेले इतर अधिकारी/कर्मचारी वर्ग यांचा महापौर हर्षाली चौधरी, आयुक्त अभिनव गोयल, उपमहापौर राहुल दामले व उपस्थित शिवसेना गटनेते विश्वनाथ राणे, भाजपा गटनेते शशिकांत कांबळे, कॉंग्रेस गटनेते कांचन कुलकर्णी, एनसीपी गटनेते रमीज मनीयार यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यावरण विभागाचे उपआयुक्त समीर भुमकर आणि सुत्रसंचालन महापालिका सचिव किशोर शेळके यांनी केले.

महानगरपालिकेने ऊर्जा संवर्धन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबाबत महाराष्ट्र शासनाने "Certificate Of Excellence" हा पुरस्कार महानगरपालिकेला जाहीर केला, ऊर्जा संवर्धन क्षेत्रात योगदान दिल्याबाबत महापालिकेचे अतिरिक्त शहर अभियंता (विद्युत /यांत्रिकी) प्रशांत भागवत आणि त्यांचे सहकारी यांचा मा. महापौर मा.आयुक्त व मा. उपमहापौर यांचे हस्ते सन्मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

# दहावीच्या परीक्षेदरम्यान वीजखंडित पर्यायी व्यवस्थेची मागणी

## राष्ट्रवादी शरद पवार गटाची शिक्षण अधिकाऱ्यांकडे तक्रार

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण(प्रशांत घोडविंदे)**: इयत्ता १० वीच्या पहिल्या लेखी परीक्षेदरम्यान कल्याणमधील अनेक शाळांमध्ये वीजपुरवठा खंडित झाल्याने विद्यार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागला. दि. २० फेब्रुवारी रोजी सकाळी ११:३० वाजल्यापासून वीज नसल्यामुळे पंखे व दिवे बंद होते, परिणामी विद्यार्थ्यांना तीव्र उकाडा व अस्वस्थतेत परीक्षा द्यावी लागली.

ही बाब अत्यंत गंभीर असल्याचे नमूद करत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरद पवार गटाचे कल्याण पश्चिम विधानसभा कार्याध्यक्ष रुपेश थळे यांनी शिक्षण अधिकारी भारत बोरनारे यांची भेट घेऊन निवेदन दिले. वीजपुरवठा खंडित झाल्यास शाळांनी तात्काळ पर्यायी व्यवस्था ठेवावी, तसेच या घटनेची चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# संत गाडगे बाबा जयंतीनिमित्त जिल्हा परिषद ठाणे आरोग्य विभागात अभिवादन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : स्वच्छता, समाजप्रबोधन आणि अंधश्रद्धा निर्मूलनाचा संदेश देणारे थोर समाजसुधारक संत गाडगे बाबा यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषद, ठाणे आरोग्य विभागात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांच्या हस्ते संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. आपल्या कार्यातून स्वच्छता हीच सेवा आणि जनजागृती हेच साधन या तत्त्वांचा पुरस्कार करणाऱ्या संत गाडगे बाबा यांच्या विचारांचा आजच्या काळात विशेष महत्त्व असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले.

कार्यक्रमास जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक डॉ. अमोल बाग, सांख्यिकी विस्तार अधिकारी सुनिल खोळंबे, आरोग्य पर्यवेक्षक विक्रांत कांबळे, सुजित जाधव, आरोग्य सहाय्यक अमर तायडे, अनिरुद्ध लोध तसेच आरोग्य विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी स्वच्छता, आरोग्य जनजागृती व सामाजिक बांधिलकी या मूल्यांचे पालन करण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला. संत गाडगे बाबा यांच्या कार्याचा आदर्श डोळयासमोर ठेवून आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध आरोग्य व स्वच्छता अभियानांना अधिक प्रभावीपणे पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# आर्य गुरुकुल अंबरनाथ शाळेचा वार्षिक दिवस साजरा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : अंबरनाथ येथील प्रतिष्ठित धर्मवीर आनंद दिघे सभागृहात ४०० विद्यार्थी आणि ७०० पालकांच्या उपस्थितीत आर्य गुरुकुल शाळेचा वार्षिक दिवस कार्यक्रम पार पडला. "माझ्या इंद्रधनुष्य मनाच्या आत - "भाव"" या कार्यक्रमाची थीम मुलांच्या भावनिक प्रवासाचे सुंदर चित्रण करते. प्रस्तुतीकरण पाच व्यक्तिमत्त्व भावनांभोवती फिरत होते - आनंद, दुःख, भीती, तिरस्कार आणि राग - ज्या ११ वर्षांच्या मुलाच्या भावनिक विकासावर प्रकाश टाकतात आणि वाढत्या मनांच्या चैतन्यशील आंतरिक जगाचे प्रतिबिंब पाडतात. या सादरीकरणांनी भावनिक संक्रमणांवर आणि सुरुवातीच्या काळात भावना समजून घेण्याचे आणि त्यांचे संगोपन करण्याचे महत्त्व विचारपूर्वक अधोरेखित केले. या कार्यक्रमाला सहाय्यक पोलिस आयुक्त शैलेश काळे यांनी लिटिल आर्यनच्या उल्लेखनीय कामगिरीचे कौतुक केले आणि आजच्या वेगाने बदलणाऱ्या जगातही, संस्कृती, परंपरा आणि मूल्ये आर्य गुरुकुल शाळेत सुंदरपणे जतन केली जातात असे नमूद केले. ४० वर्षांहून अधिक व्यावसायिक आणि जीवनाचा अनुभव असलेले, टॅक्सेस यूएसचे वेणुगोपाल मेनन यांनी सांगितले की, मुलाचा मेंदू आणि भावनिक पाया सात वर्षांच्या वयात मोठ्या प्रमाणात विकसित होतो आणि तो मजबूत पाया आर्य गुरुकुलच्या विद्यार्थ्यांमध्ये प्रतिबिंबित होतो हे ते स्पष्टपणे पाहू शकतात.

फिजिओथेरपिस्ट डॉ. लीना धांडे यांनी समग्र विकास ही काळाची गरज आहे यावर भर दिला आणि मुलांचे शैक्षणिक, भावनिक, सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या संगोपन करण्याच्या शाळेच्या वचनबद्धतेचे कौतुक केले. संस्थापक भरत मलिक आणि निलम मलिक, डिझाइन डायरेक्टर भूमिका रे, लिटिल आर्यनच्या सीईओ सपना उपल, सेंट मेरी स्कूल सीईओ वृंदा भुस्कुटे, आर्य गुरुकुल स्कूल प्राचार्य गीता नायर उत्सवाला भेट दिली.

माजी विद्यार्थी मेधा पाटील, अंश शुक्ला, अर्चित अहिरराव, पूर्वांश जैन, शिवम यादव, कृष्णा गोपलानी आणि रुचिता पोतदार यांनी त्यांचे मनापासूनचे अनुभव आणि गोड आठवणी सांगितल्या. त्यांच्या प्रवासाला आकार दिल्याबद्दल शाळेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. हा कार्यक्रम एका भव्य यशाने संपला, ज्यामध्ये केवळ कामगिरीच नव्हे तर भावना, मूल्ये आणि समग्र विकास साजरा करण्यात आला.







# टिटवाळ्यात 'निसर्गायण'ची हरित क्रांती

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**टिटवाळा :** आध्यात्मिकतेच्या छायेतून पर्यावरण संवर्धनाचा निर्णायक शंखनाद टिटवाळ्यात घुमणार असून बुधवार दि. २६ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता श्री सिद्धीविनायक मंदिर, टिटवाळा-रुंदे रस्त्यालगतच्या विस्तीर्ण पटांगणात 'निसर्गायण' या पर्यावरण शिक्षण प्रकल्पाचे भूमिपूजन होणार आहे. या उपक्रमामुळे धार्मिक ओळख असलेल्या परिसराला हरित दिशादर्शनाचा नवा आयाम मिळणार आहे.

पर्यावरण दक्षता मंडळ आणि एन्व्हायरोव्हीजल, ठाणे यांच्या संयुक्त पुढाकारातून साकार होणाऱ्या या प्रकल्पाला प्रशासन व स्थानिक स्वराज्य संस्थांचे सक्रिय सहकार्य लाभले आहे. आयुक्त अभिनव गोयल, महापौर ॲड. हर्षली चौधरी, उपमहापौर राहुल दामले तसेच नगरसेवकांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडणार असून तो भविष्यातील पर्यावरण चळवळीचा मजबूत पाया ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

वाढते नागरीकरण, जैवविविधतेचा ऱ्हास, कचरा व्यवस्थापनाची समस्या आणि हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर 'निसर्गायण' हे केवळ प्रकल्प न राहता ज्ञान, कृती आणि संवेदनशीलतेचे सजीव केंद्र ठरणार आहे. विद्यार्थ्यांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्व घटकांना प्रशिक्षण, प्रात्यक्षिक उपक्रम व मार्गदर्शन सत्रांच्या माध्यमातून पर्यावरणाशी प्रत्यक्ष नाते जोडण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे.

श्री स्वामी समर्थ मठ परिसरात उभारला जाणारा हा प्रकल्प अध्यात्म व शाश्वत विकास यांचा समतोल साधणारा आदर्श निर्माण करेल, तसेच टिटवाळ्याची ओळख पर्यावरणपूरक उपक्रमांच्या केंद्र म्हणून अधिक दृढ करेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# मुंब्रा खाडीमध्ये विषारी रसायनांचा विसर्ग

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंब्रा :** येथील रेतीबंदरजवळील खाडीत रसायन टाकण्यात येत असल्याची घटना रविवारी मध्यरात्री उघड झाली. या प्रकरणी पोलिसांनी टँकर आणि एका व्यक्तीला ताब्यात घेऊन त्याला नोटीस देत सोडून दिले.

काँग्रेस पदाधिकारी नीलेश पाटील यांच्या निर्देशनास काही जणांनी ही बाब निदर्शनास आणली. त्यांनी पोलिसांना कळविले. खाडीत सोडलेले रसायन हे भिवंडीहून आणले होते. ते रसायन किती घातक आहे, त्याचे दुष्परिणाम काय होऊ शकतात याच्या तपासणीसाठी तज्ज्ञांना बोलाविले. या प्रकरणी दोषींवर गुन्हा दाखल करण्यात आला असून लवकरच अटक केली जाईल, अशी माहिती सहायक पोलिस निरीक्षक तेजस सावंत यांनी दिली.

# म्हसा महाविद्यालयात गुरुतेग बहादुर साहिबजी शहीदी समागम निमित्त समूह गायन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**म्हसा(प्रशांत घोडविंदे) : सौ. कमलताई किसन कथोरे म्हसा महाविद्यालयात परमपूज्य श्री गुरूतेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम निमित्त हिंद दि चादर समूह गायन संपन्न**

शिखांचे नववे गुरू परमपूज्य श्री गुरुतेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त आज दि. २३ फेब्रुवारी, २०२६ रोजी सौ. कमलताई किसन कथोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय म्हसा येथे हिंद दि चादर समूहगायन करून मानवंदना देण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. योगेश माळी सर यांनी त्यांच्या शौर्य, त्याग व धार्मिक स्वातंत्र्यासाठी दिलेल्या बलिदानाविषयी माहिती दिली. त्यांच्या प्रेरणादायी जीवनकार्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, सहिष्णुता आणि नैतिक मूल्यांची जाणीव दृढ झाली. या वेळी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग कार्यक्रम अधिकारी प्रा. कन्या हरड मॅम, क्रीडा प्रशिक्षक प्रा. दिनेश शेळके सर तसेच सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## हिंद दी चादर या उपक्रमांतर्गत
# ठाण्यात गुरुद्वारात आरोग्य शिबीर

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : हिंद दी चादर या उपक्रमांतर्गत श्री गुरूतेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागमाच्या निमित्ताने आज ठाणे महानगरपालिका यांच्या वतीने ठाण्यातील गुरुद्वारात मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरास ठाणे महानगरपालिकेचे उपायुक्त उमेश बिरारी, सहाय्यक आयुक्त सोपान भाईक, माजी नगरसेवक गुरुमुखसिंग स्यान उपस्थित होते.

हे आरोग्य शिबिर ठाण्यातील तीन हात नाका येथील द्रुतगती मार्गालगत असलेल्या गुरुद्वारात पार पडले. शिबिरामध्ये नागरिकांसाठी रक्तदाब तपासणी, मधुमेह तपासणी तसेच प्राथमिक आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. गुरुद्वारा मध्ये येणाऱ्या सीख बांधवांचा या शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सर्वसामान्य नागरिकांना आरोग्याबाबत जागरूक करणे व वेळेत तपासणी करून आजारांचे निदान व्हावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.



हिंद दी चादर या उपक्रमाच्या माध्यमातून सामाजिक, आरोग्यविषयक आणि जनजागृतीपर कार्यक्रम सातत्याने राबविले जात असून, अशा उपक्रमांमुळे समाजातील विविध घटकांना थेट लाभ मिळत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

# शिक्षक पात्रता परीक्षा (TET) सक्तीमुळे शिक्षण क्षेत्रात संभ्रम

## सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाबाबत सुस्पष्टता आणण्याची मागणी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयानुसार बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम (RTE) २००९ मधील तरतुदीनुसार इयत्ता १ ली ते ८ वीच्या शिक्षकांना सेवेत येण्यासाठी शिक्षक पात्रता परीक्षा (TET) अनिवार्य करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार राज्यातील शिक्षण क्षेत्रात मोठी संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील शिक्षक प्रतिनिधींनी सविस्तर निवेदन सादर करून न्याय निर्णयाबाबत सुस्पष्टता आणण्याची मागणी केली आहे. शिक्षण क्रांती संघटनेचे राज्य अध्यक्ष सुधीर घागस यांनी शिक्षण मंत्री दादाजी भुसे, शिक्षण प्रधान सचिव रणजीत सिंह देओल, भारतीय जनता पार्टी प्रदेशाध्यक्ष आ. रविंद्र चव्हाण यांना निवेदन देत शासनाने तातडीने स्पष्ट शासन निर्णय जाहीर करावा अशी मागणी केली आहे.सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिर्णयार RTE लागू होण्यापूर्वीच सेवेत आलेल्या शिक्षकांनाही TET बंधनकारक करण्यात आली आहे. TET पात्रता धारक नसलेल्या शिक्षकांना दोन वर्षांच्या आत TET उत्तीर्ण करणे बंधनकारक केले आहे. दोन वर्षांच्या आत TET परीक्षा उत्तीर्ण न केल्यास लाभांसह सक्तीने सेवानिवृत्त केले जाईल. पाच वर्षांपेक्षा सेवा शिल्लक असलेल्या शिक्षकांना TET परीक्षा उत्तीर्ण करणे बंधनकारक नाही. पदोन्नतीसाठी TET परीक्षा उत्तीर्ण असणे बंधनकारक केले आहे.

परंतु सर्वोच्च न्यायालयाचा न्यायनिर्णय पारित झाल्याच्या दिनांकापासून दोन वर्ष कालावधीत TET उत्तीर्ण होण्याची मुदत दिली आहे. मात्र दोन वर्षापूर्वीच पदोन्नतीची जागा रिक्त झाल्यास सेवाज्येष्ठ शिक्षका ऐवजी सेवाकनिष्ठ TET उत्तीर्ण असलेल्या शिक्षकास पदोन्नती दिली जाणार आहे. हे महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१, अनुसूची फ मधील नियमाशी विसंगत आहे. नियमावली १९८१ नुसार आतापर्यंत पात्र प्राथमिक शिक्षकांसाठी अखंड सेवेत रुजू झाल्याचा दिनांक सेवाज्येष्ठतेसाठी ग्राह्य धरला जातो. यामुळे दोन वर्षांच्या आत TET परीक्षा उत्तीर्ण नसलेल्या शिक्षकाची पदोन्नती असल्यास त्याची सेवाजेष्ठता न डावलता न्यायनिर्णयानुसार TET परीक्षा उत्तीर्ण होण्याच्या अटीच्या अधीन राहून पदोन्नतीसाठी पात्र धरण्यात यावी अशी सर्वसामान्य अपेक्षा आहे. RTE अधिनियम हा ६ ते १४ वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी अर्थात इ. १ ली ते ८ वीच्या वर्गांसाठी लागू असतांना राज्यातील अनेक शिक्षणाधिकारी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळामधील पदोन्नतीसाठी देखील TET उत्तीर्ण बंधनकारक करून संभ्रमाचे वातावरण निर्माण करीत आहेत. RTE कायदा माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाला लागू नाही याबाबत शासनाने स्पष्टीकरण करणे अपेक्षित आहे. RTE लागू होण्यापूर्वी सेवेत आलेल्या शिक्षकांना शिक्षक पात्रता परीक्षेमध्ये उत्तीर्ण होण्यासाठी एकूण १५० गुणांपैकी अमागास उमेदवारांना किमान ९० (६० टक्के) व मागासवर्गीयांसाठी किमान ८३ (५५ टक्के) गुण मिळवावे लागतात. ही किमान मर्यादा कमी करून दोन्ही प्रवर्गातील उमेदवारांसाठी ४० टक्के म्हणजेच १५० पैकी ६० गुण मिळाल्यास त्यास पात्र धरण्यात यावे. RTE लागू झाल्यानंतर फेब्रुवारी २०१३ पासून TET बंधनकारक करण्यात आली आहे. याबाबतच्या शुद्धीपत्रकानुसार या दिनांकापूर्वी सेवेत आलेल्या शिक्षकांना TET मधून सूट देण्यात आली आहे. यामध्ये शिक्षकांनी कोणत्याही प्रकारचा याबाबत हलगर्जीपणा केलेला नाही. याकरिता शासनाने RTE च्या अनुषंगाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयांबाबत सर्वोच्च न्यायालयासमोर आपली भूमिका स्पष्टपणे मांडून शिक्षकांना दिलासा देणे अपेक्षित आहे.

### प्राथमिक शिक्षकांमध्ये वाढला ताण तणाव

सर्वोच्च न्यायालयाने पारित केलेल्या दि.०१/०९/२०२५ रोजीच्या न्यायनिर्णयानुसार तसेच भारत सरकार, शिक्षा मंत्रालय यांचे निर्देशानुसार शासनाने शासन निर्णय जाहीर करून संभ्रम दूर करणे अपेक्षित आहे. राज्यातील हजारो प्राथमिक शिक्षकांमध्ये या निर्णयामुळे अस्वस्थता निर्माण झाली आहे सेवा जेष्ठता, पदोन्नती व सेवानिवृत्ती यासारख्या महत्त्वाच्या बाबीवर चिंता निर्माण झाल्याने शासनाने तातडीने स्पष्ट धोरण जाहीर करावे व निवेदनाची दखल घेऊन शासन निर्णय निर्गमित करावा तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयामध्ये बदल करण्यासाठी पुढाकार घेऊन राज्यातील असंख्य शिक्षकांना दिलासा द्यावा अशी अपेक्षा राज्य अध्यक्ष सुधीर देवराम घागस यांनी व्यक्त केली आहे.

# सराईत मोबाइल चोरट्यास पालघरमध्ये अटक

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : ठाणे शहर परिसरात मोबाइलची चोरी करणाऱ्या अकबर शौकत अली शाह (२८, रा. सिद्धार्थनगर, उत्तर प्रदेश, सध्या रा. नायगाव, पालघर) याला नायगावमधून अटक केल्याची माहिती ठाणे गुन्हे अन्वेषण विभागाने रविवारी दिली. त्याच्या ताब्यातून पाच लाख २९ हजारांचे ३० मोबाइल जप्त केले.ठाण्यात मोबाइलची चोरी करणाऱ्या अकबर याची माहिती ठाणे गुन्हे अन्वेषण विभागाच्या वागळे इस्टेट युनिटचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सलील भोसले यांना मिळाली होती. त्याच माहितीच्या आधारे उपायुक्त अमरसिंह जाधव, सहायक पोलिस आयुक्त शेखर बागडे आणि निरीक्षक भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक जगदीश गावीत आणि अंमलदार उत्तम भोसले यांच्या पथकाने अकबर याला पालघरमधील नायगाव येथे अटक केली. त्याच्या घराच्या तपासणीमध्ये विविध कंपन्यांचे पाच लाख २९ हजारांचे ३० मोबाइल जप्त केले. यामध्ये कासारवडवली पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या चोरीचीही त्याने कबुली दिली.

# नाट्य रसिकहो, कल्याण आयोजित राज्यस्तरीय अभिवाचन स्पर्धा संपन्न

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई** : नाट्य रसिकहो कल्याण आयोजित राज्यस्तरीय कथा साहित्य अभिवाचन स्पर्धेत इरसाल स्टोरी टेलर्स, मुंबई यांनी सादर केलेल्या " मोर्चा " या कथेचे अभिवाचन प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरले आहे. तसेच ज्ञान वैखरी, पुणे या संस्थेने सादर केलेल्या " ज्ञान तेच देव " या कथा अभिवाचनास द्वितीय क्रमांकाचे व प्रायोगिक रंगमंच संघ, मुंबई यांनी सादर केलेल्या " राडा " या कथा अभिवाचनास तृतीय क्रमांक जाहीर झाला आहे.

तसेच स्टुडिओ- 64 पुणे या संस्थेच्या "डियर फादर".. सुमंगल फाउंडेशन कल्याण या संस्थेच्या "गुडघ्या एवढ्या महापुराची कहाणी" ... व प्रायोगिक रंगमंच संघ, मुंबई यांच्या बेईमान या कथा अभिवाचनाला सांघिक उत्तेजनार्थ क्रमांक जाहीर झाला आहे असे नाट्य रसिकहो चे





अध्यक्ष व प्रमुख आयोजक सुरेश शांताराम पवार यांनी सांगितले आहे.

या राज्यस्तरीय कथा साहित्य अभिवाचन स्पर्धेसाठी मुंबई, पुणे, नाशिक ठाणे तसेच कल्याण डोंबिवली मधील एकूण 23 संघांचा सहभाग होता आणि कल्याण मधील आचार्य अत्रे रंगमंदिर येथील कॉन्फरन्स हॉलमधील या स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभ करिता कडोंमपा सन्माननीय नगरसेविका आर्या नाटेकर, ज्येष्ठ साहित्यिक व रंगकर्मी भिकू बारस्कर, नाट्य परिषद मध्यवर्ती शाखेचे कार्यकारणी सदस्य शिवाजी शिंदे, नाट्य परिषद कल्याण शाखेचे अध्यक्ष रवींद्र सावंत, बालरंगभूमी परिषद कल्याण अध्यक्षा सुजाता डांगे, ज्येष्ठ अभिनेते राम दौंड, आनंद जाधव, सुधीर चित्ते, डॉ. प्रदीप सरवदे, किरण डांगे आणि राष्ट्रवादी सांस्कृतिक विभागाचे ठाणे जिल्हाध्यक्ष हेमंत यादगिरे यांच्या हस्ते संपन्न झाले.

या स्पर्धेचे परीक्षक म्हणून ज्येष्ठ नाट्य अभ्यासक आणि चतुरस्त्र रंग कर्मी अरुण कदम व आकाशवाणी वृत्त निवेदिका तसेच अनेक अभिवाचन कार्यक्रमाच्या अनुभव असलेल्या श्रद्धा वझे यांनी परीक्षण केले. यावेळी स्पर्धक अभिवाचकांना मार्गदर्शन करताना सर्वच संघाच्या पूर्ण तयारीनिशी केलेल्या अभिवाचनाचे दोन्ही परीक्षकांनी तोंड भरून कौतुक करताना काही संघांनी किमान वेळेची मर्यादा न पाळून आपल्या चांगल्या सादरीकरणाचे नुकसान करून घेतले असेही खडे बोल अगदी नम्रपणे सुनावले. तसेच त्यांनी नाटकातील काही मजेशीर किस्से सांगून एकूणच कार्यक्रमात एक वेगळीच रंगत आणली.

नाट्य रसिकहो अध्यक्ष म्हणून बोलताना सुरेश पवार म्हणाले की, यंदाचे या स्पर्धेचे हे सातवे वर्ष आहे. व यंदाचा प्रतिसाद हा अधिकच सुखावह असाच असल्याने यापुढे सदर स्पर्धा अधिकाधिक आकर्षक व दर्जेदार करण्यासाठी निश्चितच कटिबद्ध राहू असे सांगितले.

यावेळी स्पर्धक संघासह मंचावरील समस्त मान्यवरांनी एकूणच अभिवाचन स्पर्धेच्या शिस्तबद्ध आयोजनाचे तोंड भरून कौतुक केले. सकाळपासून संपूर्ण स्पर्धा संपेपर्यंत आवर्जून उपस्थित असणारे अभिनेते राम दौंड म्हणाले की, माझ्या आजवरच्या कला कारकीर्दितील एवढी वक्तशीर आणि नीटनेटकी स्पर्धा मी अद्याप पाहिलेली नाही.. त्याकरता सुरेश पवार यांना दिल से सॅल्यूट आहे.

यावेळी स्पर्धक संघासह मंचावरील समस्त मान्यवरांनीही एकूणच या शिस्तबद्ध आयोजन करिता सुरेश पवार यांचे कौतुक करतांना शिवाजी शिंदे म्हणाले की गेली सात वर्ष सातत्याने वाचन संस्कृती जतन करण्याचं प्रामाणिक काम ज्या निर्धाराने सुरेश पवार करत आहेत ते खरोखरच प्रशंसनीय आहे. तर सुधीर चित्ते यांनी शेरोशायरीच्या माध्यमातून अतिशय बहारदारपणे सुरेश पवार यांच्या कलाक्षेत्रातील या सातत्यपूर्ण कामगिरीबद्दल केलेले कौतुक खूपच दाद घेऊन गेले. याप्रसंगी अभिनेते सुधाकर वसईकर, अविनाश साळवी, विशाल राऊत, निलेश शास्त्री, किरण खांडगे, माणिक शिंदे, सिताराम शिंदे, महेश जोशी, हेमंत कर्णिक, डोंगरे साहेब, आदी मान्यवर मंडळी आवर्जून उपस्थित होती.

या पारितोषिक वितरण प्रसंगी एक कौतुकास्पद घटना म्हणजे .. दिवसभर सादर झालेल्या 23 संघांचे अभिवाचन पूर्णपणे ऐकणारे अभिनेते आनंद जाधव यांनी त्यांच्या वडिलांच्या स्मृती प्रित्यर्थ या वर्षापासूनच पुढे जोपर्यंत ही अभिवाचन स्पर्धा सुरू राहील तोपर्यंत प्रथम पारितोषिक रक्कम त्यांच्या वतीने देण्याचे जाहीर केले व तशी पूर्तता ही केली.

**स्पर्धेचा अधिक तपशीलवार निकाल पुढीलप्रमाणे आहे.**

**सर्वोत्कृष्ट अभिवाचक पुरुष**
**प्रथम- पुरुष घाटपांडे**
**द्वितीय- दिनेश हातिम**
**तृतीय- कौशिक साऊळ**

**सर्वोत्कृष्ट अभिवाचक स्त्री**
**प्रथम - लीला हडप**
**द्वितीय - वर्षा देशमुख**
**तृतीय- अंजली गोडबोले**

**अभिवाचक उत्तेजनार्थ**
**सुनील घोणे**
**मृदुल निवसरकर**
**महेंद्र पाटील**
**नीलम सावंत**
**निलेश गवारे**
**नमिता आफळे**
**धनंजय हरिसंगम**
**युगंधरा वळसंगकर**

**विशेष सांघिक उत्तेजनार्थ**
**श्री. दादा महाराज नाटेकर पंचकोशधारीत विद्यालय पुणे (प्रमाणपत्र)**

**उत्कृष्ट डिझाईन स्पर्धा**
**प्रथम- पूनम पाटील ॲक्टींग अकॅडमी, नाशिक**
**द्वितीय- नावांकुर प्रतिष्ठान कल्याण.**
**तृतीय- जगन्नाथाचा पुरस्कार अस्तित्व थिएटर**

सदर स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी ज्येष्ठ रंगकर्मी व मार्गदर्शक श्रीरंग दाते, सुधीर रोकडे, संजय खेडेकर, आदित्य ढोबळे , सचिन पाटील , सुरेखा गेडाम, सुनंदा जाधव, राहुल शेलार, अमित पवार आणि अत्रे रंगमंदिर येथील व्यवस्थापनासह कार्यरत सुरक्षा रक्षक यांनीही स्पर्धा यशस्वी होण्यासाठी आपापल्या परीने सहकार्य केले.





# भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर ग्रामीण** : राजे शिवछत्रपती प्रतिष्ठान कांबा या प्रतिष्ठानच्या वतीने व उल्हासनगर मध्यवर्ती रुग्णालय रक्तपेढी यांच्या सहयोगाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्ताने भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.



कांबा येथे पार पडलेल्या या रक्तदान शिबीरात कल्याण, डोंबिवली, रायते, गोवेली येथील जवळपास पन्नास पेक्षा अधिक रक्तदात्यांनी सहभाग घेत यामध्ये चार महिलांनीही रक्तदान केले. या शिबिरासाठी उल्हासनगर मध्यवर्ती रुग्णालयाचे रक्त संक्रमण अधिकारी डॉ. विलास वाघमारे, वैज्ञानिक अधिकारी डॉ. हरिश बागडे, डॉ. राजकुमार पवार, डॉ. प्रमोद जाधव, डॉ. अनुष्का झुंजाराव, डॉ.अपूर्व बोरसे, डॉ. विशाल शेलार, रुग्ण परिचर संदीप कांबळे, आकाश गायकवाड आदी कर्मचारी यांनी सहकार्य केले.

या शिबिरावेळी पोलिस निरीक्षक पंकज गिरी, पो.उप. नि. प्रशांत जाधव, जि.प.शाळेचे माजी मुख्याध्यापक वसंत काटे, मुख्याध्यापक राजेश वेखंडे, प्रतिष्ठानचे सदस्य रुपेश गायकर, सामाजिक कार्यकर्ते आत्माराम बनकरी, बाळाराम गायकर, देवराव शिरोशे, दिलीप भोईर, मंगळ केणे, माजी सरपंच अरुण तुर्भेकर, आधार अपंग संस्थेचे संस्थाध्यक्ष भगवान शिरोशे, शाखाप्रमुख रविंद्र पावशे, उद्योजक अनंता ठाकरे, मंगेश बनकरी, दिपक म्हारसे, गणेश बनकरी, दिपक शिरोशे, ग्रामसेविका सुनंदा पाटील आदी पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजे शिवछत्रपती प्रतिष्ठानचे सदस्य रुपेश गायकर यांनी केले तर यासाठी प्रतिष्ठानचे पदाधिकारी व सदस्य यांनी परिश्रम घेतले होते.

# जितेश व यशला राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत सुवर्णपदक

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण(** : २२ फेब्रुवारी २०२६ रोजी वडाळा मुंबई येथे झालेल्या राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत सुहित जीवन ट्रस्ट, पेण संस्थेतील विद्यार्थी कु.जितेश साजेकर याने ५३ किलो वजन गटामध्ये सुवर्णपदक तसेच कु.यश पांगत याने ७४ किलो वजन गटामध्ये सुवर्णपदक मिळवून आपल्या पालक, शिक्षक व संस्थेचे नाव उज्ज्वल केले आहे. या स्पर्धेत महाराष्ट्रातील अनेक दिव्यांग प्रतिस्पर्धी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. सुहित मधील विद्यार्थ्यांनी अथक मेहनत व सरावाचे उत्कृष्ट प्रदर्शन करत या स्पर्धेत आपल्या क्रीडा कर्तृत्वाने सुवर्णपदक मिळवून संस्थेचे व त्यांचे प्रशिक्षक राजेश अनगत व श्री. अमोल काईनकर यांचे नाव उंचावले आहे. विजेत्या विद्यार्थ्यांचे आणि सुहित टीमचे मनःपूर्वक अभिनंदन व शुभेच्छा.





Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024